एक राष्ट्र, एक कर,
एक बाजार
दूरध्वनी क्रमांक:- ०२२-०२३७६०८९३
ई-मेल:- dcest2@gmail.com
ई-मेल:- spcstdcest३@gmail.com

महाराष्ट्र शासन
वस्तू व सेवाकर विभाग

विशेष राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय
३ रा मजला, नवीन इमारत , ई विंग
वस्तू व सेवाकर भवन, माझगाव, मुंबई

क्रमांक:विकअ-२०२६/आस्था-२,३/गोप/स्थानां.परिपत्रक-१/व- 112 मुंबई, दिनांक:- 13 FEB 2026

प्रति,
सर्व अपर राज्यकर आयुक्त,
सर्व राज्यकर सहआयुक्त,
सर्व आस्थापना अधिकारी,

**विषय:** वस्तू व सेवाकर विभागातील अधिकाऱ्यांच्या नियत /विनंती बदलीबाबत.

**संदर्भ:** १.महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५.
२. समुदेशनाद्वारे बदलीबाबत शासन निर्णय दि.०९/०४/२०१८.

उपरोक्त विषयास अनुसरून, दरवर्षी निर्गमित होणाऱ्या परिपत्राकानुसार अधिकाऱ्यांचे बदलीसाठी विनंती अर्ज या कार्यालयास प्राप्त होत असतात.

त्यानुसार, सन २०२६ च्या नियत/विनंती बदलीसाठीचे अर्ज संबंधितांनी दि.२५/०२/२०२६ पर्यंत त्यांच्या संबंधित कार्यालय प्रमुखांकडे सादर करावेत व संबंधित कार्यालय प्रमुखांनी सदर अर्ज दि.०६/०३/२०२६ पर्यंत या कार्यालयास प्राप्त होतील अशा प्रकारे पाठवावेत. बदलीबाबत विनंती अर्ज करताना संबंधित अधिकारी यांनी अर्जावर स्वत:चा सध्याच्या निवासस्थानाचा पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक इत्यादी **माहिती नमूद करुन संबंधीत कार्यालय प्रमुखांकडे अर्ज सादर करावेत**; तसेच विनंती अर्ज ज्या कारणास्तव केला असेल त्या कारणाच्या पृष्ठ्यार्थ योग्य ती कागदपत्रे प्रमाणित करून विनंती अर्जासोबत जोडावीत.

बदलीसाठी करण्यात येणारे अर्ज हे पदस्थापनेचे ठिकाण बदलण्यासंबंधित असावे. विशिष्ट कार्यशाखा मिळण्यासाठी अर्ज सादर करण्यात येऊ नये. तसेच विनंती बदलीकरीता सध्या कार्यरत असलेल्या ठिकाणी इतर कार्यशाखेमध्ये बदली मिळण्याबाबत अर्ज सादर करण्यात येऊ नये. तसे निदर्शनास आल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

संबंधित कार्यालयाकडे प्राप्त झालेले अर्ज (योग्य मार्गाने सादर करण्याकरीता) संबंधित कार्यालय प्रमुखांनी आपल्या स्तरावर प्राथमिक पडताळणी करून, तसेच विनंती अर्ज ज्या कारणास्तव केला आहे त्या कारणाच्या पृष्ठ्यार्थ कागदपत्रांची पूर्तता केला आहे याची खात्री करूनच ते या कार्यालयाकडे पाठविण्यात यावेत.

तसेच या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, अधिकारी हे बदली बाबतचे विनंती अर्ज करताना तीन ते चार प्रतीत सादर करतात. त्यामुळे शासकीय लेखनसामुग्रीचा अपव्यय होत असल्याचे दिसून येत आहे. तरी संबंधित अधिकाऱ्यांनी **आपले अर्ज योग्य मार्गानेच या कार्यालयास विहित मुदतीत प्राप्त होतील याची दक्षता घ्यावी. आगाऊ प्रतींचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**

उपरोक्त बाब सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

सदर परिपत्रक निर्गमित होण्यापूर्वी व विहीत मुदतीनंतर या कार्यालयास प्राप्त होणाऱ्या विनंती अर्जांचा कोणत्याही परिस्थितीत विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घेण्याबाबत सर्वांना सूचित करण्यात यावे.

**(मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने)**

(संजय निकम)
राज्यकर सहआयुक्त (मुख्या.)४
महाराष्ट्र राज्य, मुंबई